# (कै.) बाळासाहेब वाघ : आदर्श जीवनाचा वस्तुपाठ

■ विवेक सावंत

**शिक्षणविषयक कार्य उभारण्यासंबंधी (कै.) बाळासाहेब वाघ यांच्यात असलेल्या अविचल निष्ठेचे मला मोठे अप्रूप वाटायचे. काय करायचे, यासंदर्भात त्यांच्या मनात कधीही संभ्रम नव्हता. अर्जुनाला लक्ष्यवेध करताना केवळ माशाचा डोळा दिसायचा, तसे भाऊंना शिक्षण संस्था आणि तिची प्रगती याविषयी वाटत असल्याचे चित्र त्यांच्या आचरणातून दिसायचे. कार्यनिष्ठा असलेले अनेक जण असतात; पण त्या निष्ठेतून कार्यप्रवण होणारी माणसे क्वचितच आढळतात. त्यामुळे वयाच्या ९१ व्या वर्षापर्यंत त्यांनी अपार कष्ट केले. जगण्यात नम्रता, कर्मावर निष्ठा आणि शिस्तीचे भोक्ते असलेल्या (कै.) बाळासाहेब वाघ उपाख्य भाऊ यांची आज ९२ वी जयंती, त्यानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला धांडोळा...**

(कै.) भाऊंचे वडील कर्मवीर काकासाहेब वाघ आणि माझे आजोबा या दोघांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध होते. काकासाहेब वाघ आमच्या घरी येऊन आजोबांशी शिक्षणाविषयी तळमळीने बोलताना मी लहानपणी पाहिलेले आहे. माझे आजोबा हे एक शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी स्वातंत्र्यापूर्वीच राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा सुरू केली होती आणि समाजातील सर्व घटकांतील विद्यार्थी त्या शाळेत येत. ते एक स्वातंत्र्यसैनिक आणि काँग्रेसचे एक सच्चे कार्यकर्तेही होते. माझे आजोबा आणि काकासाहेब वाघ पुढच्या पिढीच्या भवितव्याविषयी जी चर्चा करीत, त्याचा माझ्या मनावर नकळत संस्कार झाला. पुढे भाऊ आणि माझे वडील यांच्यात घनिष्ट संबंध निर्माण झाले. काही काळानंतर भाऊंचा आणि माझा संबंध आला, तो प्राचार्य बर्वे यांच्यामुळे ! त्यांनी भाऊंशी माझी ओळख करून दिली, त्या वेळी माझा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. कारण 'के. के. वाघ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग' या प्रथितयश व भव्य परिसर असलेल्या शैक्षणिक संकुलाचा मोठा लौकिक पुणे विद्यापीठ व संपूर्ण महाराष्ट्रभर निर्माण झालेला होता. अशा या नामांकित संस्थेचे सर्वेसर्वा, कर्ता-करविता इतका साधा आणि नम्र कसा असू शकतो, यावर माझा विश्वास बसेना. तेव्हा मी स्वतःला एक चिमटा काढून पाहिला आणि खात्री करून घेतली. ते भाऊ अर्थात बाळासाहेब वाघच होते.

'पसायदाना'त 'मार्तंड जे तापहीन' आणि 'चंद्रमे जे अलांछन' असा उल्लेख ज्ञानेश्वर माउलींनी काही आदर्श व्यक्तिमत्त्वांसंदर्भात केलेला असावा. भाऊंकडे पाहताना स्वतःच्या विषयात दिग्गज असलेले भाऊ 'मार्तंड' होते. कारण एखादी संस्था शून्यातून निर्माण करून ती उच्चतम लौकिकाप्रत कशी न्यायची, या विद्येत ते मार्तंड होते. परंतु, स्वतःचा मोठेपणा कोठेही न सांगता, त्यातील अवधित्य- अहंकार निर्माण न होऊ देता निरलस असणारे भाऊंचे व्यक्तिमत्त्व होते. त्यामुळे मला नेहमी जाणवायचे, भाऊ मार्तंड तर होतेच; पण तापहीनही होते. कारण त्यांच्याशेजारी बसल्यावर तुम्हाला त्यांच्या झळा बसत नाहीत. तुम्ही अत्यंत सहजपणे त्यांच्याशी संवाद साधू शकतात. त्यामुळे ज्ञानेश्वर माउलींना अभिप्रेत तापहीन मार्तंड असलेले समाजातील जे मोजके लोक आहेत, त्यात भाऊ हे एक होते. त्याचबरोबर, त्यांच्या संपूर्ण जीवनाकडे पाहिले असता त्यावर एकही काळा डाग नाही. त्यादृष्टीने अतिशय शीतल, सोज्वळ आणि प्रेमळ असलेल्या भाऊंना 'चंद्रमे जे अलांछन' असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.



भाऊंना संस्थाकेंद्री शिक्षण अपेक्षितच नव्हते. कारण, संस्था हे केवळ साधन आहे, साध्य नाही याची स्पष्ट कल्पना त्यांना होती. मी संस्थेतच रममाण झालेले, त्याच्या आयोजनात सबंध जीवन खर्च करताना प्रयोजने विरून गेलेले अनेक संस्थाचालक पाहिलेले आहेत. भाऊंचे संपूर्ण जीवन हे प्रयोजनावर आधारित आहे. त्यांचे प्रयोजन हे शिक्षणकेंद्री, पुस्तककेंद्री किंवा विद्यार्थीकेंद्रीही नाही. तर ते प्रयोजन आहे विद्यार्थी विकासकेंद्री शिक्षण! विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन तो आयुष्यात उभा राहिला पाहिजे, त्यासाठी प्रयत्न करणे, हे त्यांचे आणि कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेतील कार्यपद्धतीचे वेगळेपण आहे. माझ्या मते, जो आपल्या अनुयायांना नेता बनवितो, तो खरा नेता. त्यांच्यात नेतृत्व गुणांचा विकास करू शकतो, तो खरा नेता ! नेतृत्व म्हणजे काय तर, ज्यांना काम करताना अत्यंत आनंद होतो. त्यांना आपण 'लीडर'' म्हणतो आणि ज्याला काम केल्यावर आनंद होतो त्याला आपण ''फॉलोअर'' म्हणतो. ज्या विद्यार्थ्याला ज्ञान मिळविताना अधिक आनंद होतो, तो लीडर स्टुडंट आणि ज्याला परीक्षा संपल्याचा आनंद होतो तो फॉलोअर स्टुडंट ! भाऊ हे अशा प्रकारचे लीडर होते, की ज्यांना काम करताना आनंद लाभायचा आणि काम संपल्यावर ते अस्वस्थ होऊन दुसऱ्या एखाद्या कामात मिळणाऱ्या आनंदात रममाण होत. ९२ व्या जयंतीनिमित्त भाऊंना विनम्र अभिवादन.

**(लेखक 'एमकेसीएल'चे मुख्य मार्गदर्शक आहेत.)**